# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

---

**दिनांक 13.06.2019 गुरूवार**

**(गुन्हे)**

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 17 केसस17 आरोपींना अटक करून, 68,977 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 15 केसस 18 आरोपींना अटक करून 29,110 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा–या 63 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 1139 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 1,92,100 वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे प्रतापनगर – घरफोडी :**

दिनांक 12.06.2019 चे 1627 वा ते 12.06.2019 चे 1715 वा दरम्यान पो.स्टे प्रतापनगर हद्यीत साईकृपा अपार्टमेंट प्लॉट नं. 58 पहिला माळा, साईनाथ नगर लोकसेवा नगर सारनाथ बौध्दविहाराजवळ भामटी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी शिवाजी बाबुलाल सुर्यवंशी वय 59, वर्ष हे त्यांच्या पत्नीसह घराचे मुख्य दाराचे लोखंडी ग्रील गेटला कुलुप लावुन रामदासपेठ येथे बॅकेत गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्यांचे घराचे मुख्य दाराचे लोखंडी ग्रील गेटचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून स्टोररूम मधील लाकडी कपाटातुन सोन्याचे दागीणे किं. 3,73,500 रू चा मुद्येमाल चोरून नेला याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे प्रतापगर येथे पोउपनि. एम.पी. केवटी, 9881126757 यांनी आरोपीविरूध्द कलम 454,380 भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) पो.स्टे नविन कामठी – अनैसिर्गीक संभोग :**

दिनांक 12.06.2019 चे 1930 वा चे सुमारास पो.स्टे नविन कामठी हद्यीत राहणा–या फिर्यादी यांचा 12 वर्षीय अल्पवयीन मुलगा हा आपले घरासमोर खेळत असतांना वस्तीत राहणारा 16 वर्षीय विधीसंघर्ष बालक याने फिर्यादीचे मुलास चॉकलेट घेवुन देतो असे म्हणुन त्यास भोई लाईन कामठी येथे आजीच्या घरी घेवुन गेला. घरी कोणी नसल्याचा फायदा घेवुन फिर्यादीच्या मुलासोबत अनैसर्गिक लैगींक कृत्य केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे नविन कामठी येथे पोउपनि राउत, 8668316809 यांनी कलम 377 भादवि सह कलम 4, 5(एल), 8, 12 बालकांचे लैगीक अपराधापासुन सरंक्षण कायदा अन्वये गुन्हा नोदविला आहे.

**4) गिट्टीखदान – चोरी :**

फिर्यादी सौ सुचित्रा संजय झलके, वय 35 वर्ष, रा. प्लॉट नं. 64, योगेन्द्र नगर, गिट्टीखदान, नागपुर या कळमेश्वर येथे लग्नाला गेल्या होत्या लग्न समारंभ आटोपुन दिनांक 29.05. 2019 चे 1400 वा चे सुमारास कळमेश्वर येथुन स्टार बस मध्ये बसुन नागपुरला आल्या असता पो.स्टे गिट्टीखदान हद्यीत गिट्टीखदान बस स्टॉप जवळ गर्दी झाल्याने बस मधुन उतरतेवेळी फिर्यादी यांनी एक पर्स ज्यामध्ये सोन्याचे दागीणे व नगदी 2,000 रू असा एकुण 1,22,000 रू चा मुद्येमाल त्यांच्या जवळील थैली मध्ये ठेवली असता बस मधुन उतरतेवेळी कोणीतरी अज्ञात आरोपीने गर्दीचा फायदा

घेवुन फिर्यादीच्या थैली मध्ये ठेवलेली पर्स चोरून नेली. याप्रकरणी फिर्यादी यांनी पो.स्टे कळमेश्वर येथे दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला सदरचे घटनास्थळ हे पो.स्टे गिट्टीखदान चे हद्यीतील असल्याने सदरचा गुन्हा पो.स्टे कळमेश्वर येथुन पो.स्टे गिट्टीखदान येथे वर्ग केल्याने पो.स्टे गिट्टीखदान येथे सपोनि गायकवाड, 8975752531 यांनी आरोपीविरूध्द कलम 379 भादवि अन्वये गुन्हा नोदविला आहे.

<u>5) पो.स्टे हुडकेश्वर, अजनी – पळवुन नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :</u>

<u>1) हुडकेश्वर</u> – पो.स्टे कळमना हद्यीत राहणारे फिर्यादी यांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही सुटयामध्ये पो.स्टे हुडकेश्वर हद्यीत राहणा–या आजीकडे आली होती. दिनांक 11.06.2019 चे 1530 वा चे सुमारास ती आपल्या मैत्रीणीसह पो.स्टे हुडकेश्वर हद्यीत पंचतारा बार मानेवाडा चौक येथुन पारडी करीता बसमध्ये बसुन पारडी पर्यंत गेली व तेथे मैत्रीणीला थांबवुन ती वस्तीत राहणारा आरोपी भुपेन्द्र राधेलाल यादव, वय 20 वर्ष, याचे सोबत ऑटोमध्ये बसुन निघुन गेली. परत आली नाही शोध घेतला असता मिळुन आली नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे हुडकेश्वर येथे सपोउपनि नरेन्द्र गिरी, 7066698877 यांनी आरोपीविरूध्द कलम 363 भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>2) अजनी</u> – दिनांक 12.06.2019 चे 2030 वा चे सुमारास पो.स्टे अजनी हद्यीत राहणारे फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि घरी कोणाला काही न सांगता निघुन गेली. परत आली नाही. शोध घेतला असता मिळुण आली नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे अजनी येथे पोउपनि टेमगीरे, यांनी कलम 363 भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>6) पो.स्टे गणेशपेठ – फसवणुक :</u>

फिर्यादी प्रदिप ज्ञानेश्वर वानखेडे, वय 53 वर्ष, रा. प्लॉट नं. 485, दर्शन कॉलोनी, न्यु नंदनवन नागपुर यांचे व त्यांच्या पत्नीचे स्टेट बॅक ऑफ इंडीया वर्धमान नगर नागपुर येथे जॉईन्ट खाते असुन दिनांक 30.12.2018 ते दिनांक 06.05.2019 चे 1130 वा दरम्यान कोणीतरी अनोळखी आरोपीने फिर्यादीचे खात्यातुन ऑनलाईन पध्दतीने 80,000 रू तसेच पो.स्टे गणेशपेठ हद्यीतील गितांजली चौक, सि.ए रोड वरील एस.बी.आय ए.टी.एम व्दारे 51,000 रू विड्रॉल करून फिर्यादीची एकुण 1,31,000 रू ची फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे गणेशपेठ येथे सपोउपनि राजु तांबुळकर, 9527795334 यांनी आरोपीविरूध्द कलम 420 भादवि सह कलम 66(ब) आय.टी ॲक्ट अन्वये गुन्हा नोदविला आहे.

<u>(अकस्मात मृत्यु)</u>

<u>पो.स्टे. मानकापुर, सदर, तहसिल, कोतवाली, सक्करदरा, एमआयडीसी,</u>

<u>1) मानकापुर</u> – दिनांक 11.06.2019 वे 2300 वा चे सुमारास पो.स्टे मानकापुर हद्यीत गोरेवाडा वॉटर फिल्टर चे मागे कार्पोरेशन दवाखान्या जवळ, नागपुर येथे राहणा–या जयवंताबाई दौलतराव सहारे, वय 65 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 12.06.2019 चे 1400 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे मानकापुर येथे सपोउपनि विजय नाईक, 9923113110 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

<u>2) सदर</u> – दिनांक 08.06.2019 चे 1500 वा पुर्वी पो.स्टे सदर हद्यीत हसन गॅरेज जवळ राहणारी कु चैताली किरण जांभुळकर, वय 16 वर्ष, हीने आपल्या राहते घरी पेट्रोल पिल्याने तिची प्रकृती खराब झाली तिला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक 12.06.2019 चे 1840 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे सदर येथे पोउपनि नागरगोजे, 9823905926 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

<u>3) तहसिल</u> – दिनांक 12.06.2019 चे 1800 वा पुर्वी लक्षमन शंकरराव जांभुळकर, वय 30 वर्ष, रा. प्रवेश नगर, ख्वाजा एस.टी.डी मागे, यशोधरानगर, नागपुर हा पो.स्टे तहसिल हद्यीत

ईतवारी तिननल चौक येथे बेशुध्द अवस्थेत मिळुण आला त्याला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी फिर्यादी विजय शंकरराव जांभुळकर, यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे तहसिल येथे पोउपनि ए.एस.स्थुल, 9850081750 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

<u>4) कोतवाली</u> – दिनांक 12.06.2019 चे 1530 वा चे सुमारास पो.स्टे कोतवाली हद्यीत नवाबपुरा कार्पोरेशन शाळे जवळ राहणारे अमोल पांडुरंग पोकळे, वय 35 वर्ष याने आपल्या राहते घरी चादरीने गळफास लावला असता त्याला खाली उतरवुन उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे कोतवाली येथे पोउपनि टोपले, 8999498710 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

<u>5) सक्करदरा</u> – दिनांक 12.06.2019 चे 0730 वा चे सुमारास पो.स्टे सक्करदरा हद्यीत क्वॉर्टर नं. 6/57 रघुजीनगर, नागपुर येथे राहणा–या संचाली मनिष जाधव, वय 37 वर्ष, यांनी आपले राहते घरी सिलींग फॅनला साडीच्या सहायाने गळफास लावुन आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी मनिष प्रभाकर जाधव, वय 40 वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे सक्करदरा येथे मपोउपनि मेसरे, 7038971406 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

<u>6) एमआयडीसी</u> – दिनांक 12.06.2019 चे 1945 वा चे सुमारास अंदाजे 50 वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसम हा पो.स्टे एमआयडीसी हद्यीत निलडोह नाल्याजवळ मृत अवस्थेत मिळुण आला. याप्रकरणी फिर्यादी विरेन्द्र पांडुरंग रवराळे, वय 31 वर्ष, रा. वार्ड कं. 6 गेडाम ले आउट आय सी चौक, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे एमआयडीसी येथे सपोनि भास्कर गोरवे, 7045634249 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर